# कौटुंबिक अत्याचाराचा दिव्यांग महिलांवर होणारा परिणाम : विशेष संदर्भ वाशिम व यवतमाळ जिल्हा

**कोमल दिलीपराव पतंगराव**
श्री सरस्वती समाजकार्य संशोधन
केंद्र वाशिम, यवतमाळ

**डॉ. एस. एन. शिंदे**
श्री सरस्वती समाजकार्य संशोधन
केंद्र वाशिम, यवतमाळ

**शोध सार -**
कौटुंबिक हिंसाचार हि समाजाला लागलेली सर्वात मोठी किड आहे. वर्तमानकाळात सर्वात मोठी समस्या म्हणजे कोणती ? तर कौटुंबिक हिंसा. कौटुंबिक हिंसेत सर्वात जास्त महिलांना बळी पडावे लागते. मग ती महिला सुशिक्षित असो वा असुशिक्षित, ग्रामीण भागातील असो वा शहरी भागातील सर्वच क्षेत्रात आपल्याला मोठ्या प्रमाणात महिलांवर कौटुंबिक अन्याय होतांना दिसून येतात. अपंग महिलांवर मोठ्या प्रमाणात कौटुंबिक हिंसाचार होत आहे. त्या महिला विकलांग असल्यामुळे सासरकडची मंडळी हीन समजतात, तिला वारंवार मारहाण करतात. स्त्रीच्या विकलांगतेमुळे तिचा स्वाभिमान दुखावतात, वारंवार तिचा आत्मविश्वास दुखावतात. तिला कमी लेखतात, महिलांचे संपूर्ण स्वातंत्र्य हिरावून घेतात. अश्यामुळे विकलांग महिला नैराश्याकडे वळतात. किंबहुना आत्महत्या करण्याचा प्रयत्न करतात.
महिला ही सुदृढ असो वा विकलांग असो तिच्या वाट्याला हिंसाचार, अत्याचार, हुंडाबळी या समस्या तोंड आ करून पाहत आहेत. आणि यात निष्पाप महिलांचा बळी जातो. महिलांना विकलांग बनविल्या जाते. ज्या महिला शारीरिक विकलांग असतात. या महिलांना कुटुंबात, समाजात अतिशय खालच्या पातळीचे स्थान दिल्या जाते. ज्यामुळे महिला ह्या कौटुंबिक अत्याचाराच्या शिकार होतांना दिसून येतात. वरील सर्व स्थितीस अनुसरून प्रस्तुत संशोधन कौटुंबिक अत्याचाराचा दिव्यांग महिलांवर होणारा परिणाम यावर आधारीत आहे. ( विशेष संदर्भ :- वाशिम व यवतमाळ जिल्हा )

**प्रस्तावना :-**
विकलांगता ही अशी घटना आहे कि जि जाणीवपूर्वक किंवा हेतुपुरस्पर निर्माण केल्या जात नाही. निसर्गाने सर्वांना समान हक्क, अधिकार दिले आहे. मग एखादी स्त्री किंवा महिला हि जन्मतःच विकलांग असेल तर त्यात त्या महिलेचा काय दोष ?
संपूर्ण जगात महिलांवर अत्याचार होतांना आपल्याला पाहायला, ऐकायला मिळते . परंतु भारतात तर याचे अगदी खराब चित्र पाहायला मिळते. विकलांग महिलेचा आत्मविश्वास खालावलेला असतो. परंतु महिलेच्या शारीरिक विकलांगतेमुळे तिच्यावर मोठ्या प्रमणात शारीरिक, सामाजिक, आर्थिक अत्याचार होतात. समाजात दिव्यांग महिलांना तुच्छ समजल्या जाते तिला समाजात हिन वागणूक दिल्या जाते. दिव्यांग महिला ही जन्मतःच दुसऱ्यावर अवलंबून असते. पण ति परावलंबी असल्या कारणाने तिच्यावर सामाजिक, आर्थिक, शारीरिक अत्याचार केल्या जातात. वर्तमान काळात दिव्यांग महिला ह्या उच्च पदावर काम करतांना दिसून येतात. परंतु त्यांच्या वाट्याला घरगुती हिंसा हि दिसूनच येते.
अपंगांचे चे हक्क आणि प्रतिष्ठा जपण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर कायदे व त्यांची अंमबलबजावणी केल्या जाते. भारतीय संविधानाने सर्व नागरिकांना न्याय, समानता, स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठा याचे आश्वासन दिले आहे. घटनेनुसार अपंगांच्या सक्षमीकरनाची जबाबदारी राज्य सरकारवर सोपविण्यात आली आहे.
घटनेच्या २५३ व्या कलमात संघराज्य सूचीतील १३ क्रमांकाच्या मुद्यामध्ये अधिनियमीत केले आहे. की “अपंग व्यक्ती (समान संधी, हक्काची सुरक्षा आणि संपूर्ण सहभाग) कायदा १९९५ नुसार अपंगांना समान संधी मिळेल तसेच राष्ट्र उभारणीच्या कार्यात त्यांचा संपूर्ण सहभाग राहील ( भारतीय राज्यघटना ) दिव्यांग लोकांना त्रास देणाऱ्या अथवा अपमानास्पद वागणूक देणाऱ्यावर यापुढे ॲट्रॉसिटीचा गुन्हा नोंद होवून त्याकरता दंड ६ महिने ते ५ वर्षापर्यंतची सक्त कारावासाची शिक्षा ठोठावणारा कायदा ( द राईटस ऑफ पर्सनल विथ डिसॲबिलिटी ॲक्ट २०१६

**व्याख्या :-**
**दिव्यांग महिला :-**
१)ज्या महिलेमध्ये चालण्या बोलण्याची शारीरिक अक्षमता दिसून येते त्या महिलेस दिव्यांग महिला म्हणतात.
२)अपंग, विकलांग असे पाहिल्यानंतर आपल्या डोळयां समोर हाताने, पायाने, डोळ्याने अपंग, लुळे पांगळे असणाऱ्या महिला म्हणजे दिव्यांग महिला होय.
विकलांग महिलांसोबत दुहेरी भेदभाव होतो. एक तर त्या महिला विकलांग असल्या कारणाने आणि दुसरे महिला असल्यामुळे. त्यावर हिंसाचार, दुर्व्यवहार केल्या जाते. कोणत्याही व्यक्तीला प्राकृतिक रुपानुसार दुर्बल किंवा अक्षम असल्यास समाजाचा व्यवहार त्या व्यक्तीसोबत प्रतिकूल असतो. ( रेणु अधलखा २०१० )
महिलांना कुटुंब, समाजाच्या रुढी, प्रथा, जबाबदाऱ्या विकलांग बनवतात. पण त्यातच ती महिला विकलांग असल्यास तिच्यावर मोठ्या प्रमाणात कौटुंबिक अत्याचार होतात. (निरिक मल्होत्रा २००४)
( अनिता घई २००६ ) भारतामध्ये विकलांग महिलांच्या मुददयावर आवाज उठवून त्यांना सशक्त केल्या जाते.
मिनू भम्बानी (२००३ ) यांनी **Social Respose to Woman with disability in india** या लेखात त्यांनी बॉलीवूडमधील काही विकलांग महिलांचे अध्ययन केले.

**संशोधन पद्धती आणि उद्द्येश :-** प्रस्तुत संशोधन हे वाशिम व यवतमाळ जिल्ह्यातील कौटुंबिक अत्याचाराचा दिव्यांग महिलावरील परिणामावर केंद्रित आहे. प्रस्तुत संशोधन समुपदेशन केंद्रावर नोंदणीकृत अत्याचारग्रस्त विवाहित महिलांपैकी नमुना पद्धती अंतर्गत कोटा नमुना निवड पद्धत वापरून समान प्रतिनिधित्व या तत्वाचा वापर करून २० टक्के म्हणजे ६१९ पिडीत महिलांची निवड करण्यात आली. संशोधन वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा वापर करण्या आला आहे. सर्वेक्षण पद्धती अध्ययन पूर्ण करण्यासाठी तथ्य संकलन हे ससंरचित मुलाखत अनुसूची द्वारे करण्यात आलेले आहे.

**उद्द्येश :-**
१)दिव्यांग महिलांची वैयक्तिक व कौटुंबिक स्थिती अभ्यासणे.
२)कौटुंबिक अत्याचाराचा दिव्यांग महिलांवरील आर्थिक परिणाम अभ्यासणे.
३)कौटुंबिक अत्याचाराचा दिव्यांग महिलांवरील सामाजिक परिणाम अभ्यासणे.

**आर्थिक आणि सामाजिक परिणाम :-**कौटुंबिक अत्याचारग्रस्त महिलांवरील सामाजिक अत्याचार पाहता त्यांना विविध

आर्थिक आणि सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यांना आर्थिक बाबतीत कुठलेही स्वातंत्र्य नाही. सासरचे लोक पैसे देत नाहीत, त्यांच्या अन्न, वस्त्र,निवारा या गरजा अपूर्ण राहतात.त्याचबरोबर त्यांना समाजिक स्वातंत्र्य नाही. घरातील मंडळी हिनतेची वागणूक देतात. सण-समारंभात सहभागी होवू देत नाहीत. शेजारच्या लोकांना बोलू देत नाहीत. प्रस्तुत संशोधनात सहभागी स्त्रियांना आर्थिक व सामाजिक समस्यांना समोरे जावे लागते का ? याची संपूर्ण माहिती जाणून घेण्यासाठी व परिणाम तपासणच्या प्रक्रियेत १० घटकांचे मिळून एक अनुमापन तंत्र विकसित केले गेले त्यातील प्रत्येकास तीन पर्याय मुळीच नाही, मध्यम, जास्त असे गुण दिले. (आर्थिक सारणी ) वारंवार, कधीतरी, कधीच नाही असे गुण दिले. ( सामाजिक सारणी )

## सारणी १.१ आर्थिक परिणाम

| अ. क्र. | वक्तव्ये | मुळीच नाही | मध्यम प्रमाणात | जास्त प्रमाणत | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १) | आर्थिकखर्च वाढला | १६.१ | ३२.१ | ५१.८ | १०० |
| २) | पैसे देतात | ७३.२ | २३.२ | ३.६ | १०० |
| ३) | आर्थिक स्वातंत्र्य आहे | ६६.० | 30.४ | ३.६ | १०० |
| ४) | पैशाची चणचण जाणवते | ३.६ | १७.९ | ७८.५ | १०० |
| ५) | गरजा अपूर्ण राहतात | ३.६ | २१.४ | ७५.० | १०० |
| ६) | आर्थिक स्थिती खालावलेली | ३.६ | १७.९ | ७८.५ | १०० |

**सारणी क्र . १.१**

सारणी क्र.१.१ वरील विविध आर्थिक परीणाम या बद्दलच्या वरील विधानांनवरून आर्थिक खर्च वाढला या विधानाशी १६.१ टक्के उत्तरदाते मुळीच नाही या मताशी सहमत आहेत. ३२.१ टक्के उत्तरदाते मध्यम प्रमाणात सहमत आहेत. ५१.८ टक्के उत्तरदाते या मताशी सहमत आहेत.

कौटुंबिक हिंसाचारामुळे सासरकडची लोक पैसे देतात. या विधानाशी सर्वात जास्त ७३.२ टक्के उत्तरदाते मुळीच नाहीत या मताशी सहमत आहेत २३.२ टक्के उत्तरदाते मध्यम प्रमाणात या मताशी सहमत आहेत ३.६ टक्के उत्तरदाते जास्त प्रमाणात या मताशी सहमत आहेत.

कौटुंबिक अत्याचारामुळे आर्थिक स्वातंत्र्य आहे या विधानाशी ६६.० टक्के उत्तरदाते मुळीच नाही या मताशी सहमत आहे. **30.४** टक्के उत्तरदाते मध्यम प्रमाणत या मताशी सहमत आहे. ३.६ टक्के उत्तरदाते जास्त प्रमाणात या मताशी सहमत आहेत.

सासरकडची मंडळी पैसे देत नसल्यामुळे पैशाची चणचण जाणवते या विधानाशी ३.६ टक्के उत्तरदाते मुळीच नाही या मताशी सहमत आहेत. १७.९ टक्के उत्तरदाते मध्यम प्रमाणत या मताशी सहमत आहेत. ७८.५ टक्के उत्तरदाते जास्त प्रमाणात या मताशी सहमत आहेत.

कुठल्याही प्रकारचे आर्थिक स्वातंत्र्य नसल्यामुळे गरजा अपूर्ण राहतात. ३.६ टक्के उत्तरदाते मुळीच नाही या मताशी सहमत आहेत. २१.१ टक्के उत्तरदाते मध्यम प्रमाणात या मताशी सहमत आहेत. ७५.० टक्के म्हणजे सर्वात जास्त उत्तरदाते जास्त प्रमाणात या मताशी सहमत आहेत.

सासरकडची मंडळी पैसे देत नसल्याकारणाने आर्थिक स्थिती खालावलेली आहे. ३.६ टक्के उत्तरदाते मुळीच नाही या मताशी सहमत आहेत. १७.९ उत्तरदाते टक्के मध्यम प्रमाणात या मताशी सहमत आहेत. सर्वात जास्त ७८.५ टक्के उत्तरदाते जास्त प्रमाणात या मताशी सहमत आहेत.

**सारणी १.2 विविध समाजिक परिणाम**

| अ. क्र. | वक्तव्ये | वारंवार | कधीतरी | कधीच नाही | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १) | समाजात दुय्यम वागणूक मिळते | ७०.५ | २०.५ | ९ | १०० |
| २) | समाजिक सण-समारंभात सहभागी होऊ देतात | ९.८ | १४.६ | ७५.६ | १०० |
| ३) | शेजारी नातेवाईक यांच्याशी बोलू देतात | ३.६ | १७.९ | ७८.५ | १०० |
| ४) | माहेरी जावू देतात | ४.२ | २१.४ | ७४.४ | १०० |
| ५) | हिनतेची वागणूक देतात | ७६.४ | २०.२ | ३.४ | १०० |
| ६) | वारंवार अपमान करतात | ७८.५ | १७.९ | ३.६ | १०० |

**सारणी क्र.१.२** वरील विविध सामाजिक परिणाम या बद्दलच्या विधानावरून समाजात दुय्यम वागणूक मिळते या विधानाशी ७०.५ टक्के उत्तरदाते वारंवार या मताशी सहमत आहेत २०.५ टक्के उत्तरदाते कधीतरी या मताशी सहमत आहेत ९.० टक्के उत्तरदाते कधीच नाही या मताशी सहमत आहेत.

कौटुंबिक अत्याचारामुळे महिलांना सामाजिक सण-समारंभात सहभागी होवू देतात. या विधानाशी ९.८ टक्के उत्तरददाते वारंवार या मताशी सहमत आहेत. १४.६ टक्के कधीतरी या मताशी सहमत आहेत. सर्वात जास्त ७५.६ टक्के उत्तरदाते कधीच नाही या मताशी सहमत आहेत.

कौटुंबिक अत्याचारामुळे सामाजिक स्वातंत्र्य हिरावून घेतले. शेजारी, नातेवाईक यांच्याशी बोलू देतात. या विधानाशी ३.६ टक्के उत्तरदाते

वारंवार या मताशी सहमत आहेत. १७.९ टक्के उत्तरदाते कधीतरी या मताशी सहमत आहेत. ७८.५ टक्के उत्तरदाते कधीच नाही या मताशी सहमत आहेत. माहेरी जाऊ दिल्या जाते या मताशी ४.२ टक्के उत्तरदाते वारंवार या मताशी सहमत आहेत.२१.४ टक्के उत्तरदाते कधीतरी या मताशी सहमत आहेत. ७४.४ टक्के उत्तरदाते कधीच नाही या मताशी सहमत आहेत.

कौटुंबिक अत्याचारामुळे सासरकडची मंडळी हिनतेची वागणूक देतात. या विधानाशी ७६.४ टक्के उत्तरदाते वारंवार या मताशी सहमत आहेत. २०.२ टक्के उत्तरदाते कधीतरी या मताशी सहमत आहेत. ३.४ टक्के उत्तरदाते कधीच नाही या मताशी सहमत आहेत.

कौटुंबिक अत्याचारामुळे उत्तरदात्यांचा वारंवार अपमान करतात. वारंवार अपमान करतात. या विधानाशी ७८.५ टक्के उत्तरदाते वारंवार या मताशी सहमत आहेत. १७.९ टक्के उत्तरदाते कधीतरी या विधानाशी सहमत आहेत. ३.६ टक्के उत्तरदाते कधीच नाही या मताशी सहमत आहेत.

**निष्कर्ष :-**

सारणी १.१ मधील विश्लेषनावरून असा निष्कर्ष निघतो कि जास्त महिलांना कौटुंबिक अत्याचारामुळे आर्थिक स्वातंत्र्या नाही, पैशाची चणचणं जाणवते, आर्थिक गरजा पूर्ण होत नाहीत, दिवसेंदिवस आर्थिक परिस्थिती खालावत आहे. सारणी १.२ मधील विश्लेषना वरून असा निष्कर्ष निघतो की सासरकडची मंडळी समाजात दुय्यम, हीन वागणूक देतात, माहेरी जावू दिल्या जात नाही, वारंवार अपमान करतात. कौटुंबिक अत्याचारामुळे उत्तरदत्याच्या आर्थिक, सामाजिक स्वातंत्र्यावर गदा आली आहे. असे अभ्यासात दिसून येते. दिवसेंदिवस सामाजिक, आर्थिक जीवन खालावत आहे. सारांशत: असे लक्षात येते की कौटुंबिक अत्याचारामुळे दिव्यांग महिलांना आर्थिक आणि सामाजिक समस्यांना मध्यम ते उच्च प्रमाणात समोरे जावे लागत आहे.

*****************************

## Bibliography

1. n, K. (1998). Money can't buy me love? Re-evaluating gender, credit and empowerment in rural Bangladesh. Institute of Development Studies.
2. Action, Aid (2003). Just people-nothing special, nothing unusual. Bangalore: Books for Change.
3. Addlakha, R. (December, 2006). Body politics and disabled femininity: perspectives of adolescent girls from Delhi (India). Paper presented at The International Conference on a World in Transition: New challenges to gender justice, Gender and Development Network and Centre for Women's Development Studies, New Delhi, India.
4. Addlakha, R. (2008). Disability, gender and society. Indian journal of gender studies, 15:191-207
5. Albrecht, G.L., Seelman, K. and Bury, M. (Editors). (2001). Handbook of disability studies. London: Sage Publications, Inc.

6.https://www.ijfcm.org/journal-article-file/13600
7.Patil, V. (2020, October). Impact of 'protection of women against domestic violence act', 2006, on domestic violence among ever-married women in India. In APHA's 2020 VIRTUAL Annual Meeting and Expo (Oct. 24-28). APHA.https://apha.confex.com/apha/2020/meetingapi.cgi/Paper/474988?filename=2020 Abstract474988.pdf&template=Word
8.Sihag, R. (2018). Issue of domestic violence in India. Indian Journal of Health & Wellbeing, 9.shorturl.at/LTX56
9.Kumar, A. (2017). Causes of Domestic Violence in a Particular Area. Asian Journal of Research in Social Sciences and Humanities, 7(8), 105-112.
10.https://www.indianjournals.com/ijor.aspx?
11.target=ijor:ajrssh&volume=7&issue=8&article=010
12.Khan ME, Townsend JW, Sinha R, Seema LS. Sexual violence within marriage a case study of rural Uttar Pradesh. IntQ Community Health Educ 2002;21:133- 46.
13. https://mr.vikaspedia.in > social-wel...
14. www.irjmsh.com
15. Patanagrao, K(2023) A study of financial statuse of married women victims of Domestic Violence, Chronicle Of Humanities And Cultural Studies, International Journal.